एकाकी पदाच्या (Isolated Post)
आरक्षणाबाबत.

# महाराष्ट्र शासन
## सामान्य प्रशासन विभाग
## शासन निर्णय क्रमांकः बीसीसी-२०२६/प्र.क्र. ०५/आरक्षण-५

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
तारीख: ०६ एप्रिल, २०२६

**संदर्भ:-**

१) **शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०७९/१५५/१६-ब, दि.१९.१२.१९७९.**
२) **शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०९३/३१८७/प्र.क्र.१७१/९३/१६-ब, दि.२१.०२.१९९४.**
३) **शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०९३/३१८७/प्र.क्र.१७१/९३/१६-ब, दि.१२.०७.१९९६.**
४) **शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०९३/३१८७/प्र.क्र.१७१/९३/१६-ब, दि.०२.११.१९९६.**
५) **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०९७/प्र.क्र.२०/९७/१६-ब, दि.२१.०९.१९९८.**
६) **महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१.**

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भ क्र. १ ते ४ मधील शासन परिपत्रक व संदर्भ क्र.०५ मधील शासन निर्णयान्वये एकाकी पदास आरक्षण धोरण लागु राहणार नाही असे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच, महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ मधील च्या कलम ३(१)(घ) मधील तरतुदीनुसार एकाकी पदास आरक्षण लागू राहणार नाही. सदर सर्व शासन निर्णय/परिपत्रकाचे अधिक्रमित करुन सुधारित आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

## शासन निर्णय:-

उपरोक्त संदर्भाधीन क्र. १ ते ५ येथील शासन परिपत्रक/शासन निर्णय अन्वये दिलेले आदेश अधिक्रमीत करुन खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती(विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ च्या कलम ३(१)(घ) मधील तरतुदीनुसार एकाकी पदाला सरळसेवेने/पदोन्नतीने आरक्षण लागू होत नाही.

एकाकी पदावर सरळसेवेने नियुक्ती गुणवत्तेनुसार करण्यात यावी. तसेच पदोन्नती करतांना केवळ ज्येष्ठता व पात्रता विचारात घेण्यात यावी. एकाकी पदाला आरक्षण लागू होत नसल्याने अनुशेषाचा प्रश्न उद्धभवत नाही.

हे आदेश, शासकीय/निमशासकीय सेवा/मंडळे/महामंडळे/ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था/ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/शासकीय अनुदान प्राप्त संस्था/विद्यापीठे/सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४०६१२५२५४५१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUDAM EKNATH ANDHALE

Digitally signed by SUDAM EKNATH ANDHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=257966df2620df1403d35023802519a4fbdcfcd894791eba41c2aef2b4c4b975, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7B57FEE59F0E7101B822A49C72629C21BF9B4DC0BDE136817EE19B6B347E77F4, cn=SUDAM EKNATH ANDHALE
Date: 2026.04.06 12:54:03 +05'30'

**( सु. ए. आंधळे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-३५.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा.उप मुख्यमंत्री, नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.उप मुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद.
७. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा.
८. सर्व मा. विधानपरिषद सदस्य/मा. विधानसभा सदस्य/मा. संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.

९. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
१०. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
११. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), मुंबई.
१२. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई.
१३. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
१४. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई.
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई.
१८. प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१९. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद.
२०. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२१. सचिव, राज्य निवडणूक आयोग.
२२. सचिव, राज्य माहिती आयोग.
२३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२४. राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक.
२५. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
२६. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका.
२७. संचालक, समाजकल्याण, पुणे.
२८. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
२९. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
३०. संचालक, सेवायोजन, मुंबई.
३१. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
३२. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर.
३३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
३५. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
३६. सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३७. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई.
३८. सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य.
३९. निवडनस्ती (कार्या. आरक्षण-५).